नि.फौ.ख.क्र.४८/२०२५
शासन विरुध्द विजय
नि.क्र.१६ पुढे

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरू-**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.डी.खामकर-**

४. हे म्हणणे खरे आहे की, धनाजी शंकर धनावडे हे माझे वारूंगुळदार आहेत. बैलाद्वारे शेत मेहनत मशागतीचा दर त्यातील पिकाचे स्वरूप व काम पाहून ठरविण्यात येत असतो. यमुना यांच्या शेतात मी कोणत्या स्वरूपाची मेहनत मशागत करण्यासाठी गेलो होतो त्याबाबत मी पोलिसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १८.०६.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता यमुना यांच्या शेतात मी मेहनत मशागत करण्यासाठी गेलो होतो हे दर्शविण्यासाठी माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. यमुना बाबर सद्यस्थितीत हयात आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी यमुना यांच्या किकली येथील जमिनीचे ७/१२ उतारे पाहिलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, यमुना बाबर व माझे संबंध चांगले आहेत. यमुना बाबर व आरोपींमध्ये दिवाणी स्वरूपाचे वाद ब-याच वर्षांपासून प्रलंबित असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०६.२०२४ रोजी मी यमुना बाबर यांच्या शेतात कधीही मेहनत मशागत करण्यासाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत धनाजी शंकर धनावडे असल्याचे देखील मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी वैशाली बाबर व आरोपी यांच्यात जाणे-येणेच्या वाटेवरून वाद सुरू होते असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसे वाद सुरू झाल्यामुळे मी व धनाजी अवजारे व बैल घेवून तेथून निघून आल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी विजय तेथे आला व त्याने माझा गळा आवळला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०६.२०२४ रोजी मी सरतपासात सांगितलेली कोणतीही घटना घडलीच नव्हती.

५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी विजय याने त्यांच्या जागेत उर्किडा करण्याकरीता मला जागा दिली होती. साक्षीदार सांगतो की, ती जागा आमच्या घरालगतच आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेवर आरोपीला स्वच्छतागृहाचे बांधकाम करावयाचे होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या करीता आरोपी विजय मला ती उर्किड्याची जागा रिकामी करण्याकरीता सांगत होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०६.२०२४ रोजी दुपारी

२.३० वाजता धनाजी शंकर धनावडे यांच्या घरासमोर आरोपी विजय याने मला ती उर्किड्याची जागा रिकामी करण्याकरीता पुन्हा विनंती केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी व धनाजी यांनी मिळून आरोपी विजय यास लाथाबुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ केली होती. त्याबाबत आरोपी विजयने भुईंज पोलिस ठाणे येथे तक्रार नोंदविल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या मारहाणीमध्ये विजयला दुखापत होवून त्याने ग्रामिण रूग्णालय, भुईंज येथे दिनांक १८.०६.२०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता औषधोपचार घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या कारणामुळे मी आरोपीविरूध्द प्रस्तुतची खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेली सायंकाळी ६.३० वाजताची कोणतीही घटना घडलीच नव्हती.

६. आरोपी शंकर जाधव हा पुणे येथे वॉचमनची नोकरी करीत असलेबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, शंकर जाधव यांनी मला दगडाने कोणतीही मारहाण कधीही केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्या मारहाणीबद्दल मी भुईंज पोलिस ठाणेत कोणतीही तक्रार दिली नव्हती व भुईंज प्राथमिक आरोग्य केंद्रात कोणतेही उपचार घेतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला रूग्णालयात उपचार घेण्याइतपत कोणतीही मारहाण झालीच नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी आरडाओरडा झाल्याने शंकर तेथून पळून गेल्याचे मी पोलिसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला चक्कर आल्यासारखे झाले म्हणून मी अर्धा तास घरी थांबलो असे देखील पोलिसांना सांगितले नव्हते. सदरील बाबी पोलिसांनी माझ्या जबाबात का नमुद केल्या नाहीत याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशा कोणत्याही घटना घडल्याच नव्हत्या आणि त्यामुळे मी त्या विषयी पोलिसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१७ व १८ वरील फिर्याद तसेच छापील खबर यातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडून कोणताही दगड तसेच शर्ट जप्त केलेला नव्हता. सदरील जप्तीचे कार्यवाही पोलिस ठाण्यात झाली होती. ती जप्तीची कार्यवाही तेथे कथित घटनेच्या काही दिवसांनी झाली. तशी कार्यवाही नेमकी किती दिवसांनी झाली होती याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरासमोरील रस्त्यावरून बेलमाचीकडे जाणारी वर्दळ असते. हे म्हणणे खरे नाही की, माझे घर शेतात बांधलेले असून ते गावठाणात नाही. माझ्या त्या घराशेजारी गोळे व निंबाळकर

यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल-ए व बी वरील दगड तसेच शर्ट माझ्या समक्ष जप्त केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील ऐवजाचा कथित घटनेची काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतची खोटी तक्रार आरोपीने माझ्या विरूध्द दिनांक १८.०६.२०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास मी त्यास मारहाण केल्याने फिर्याद दिल्याने दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणतीही पंचनामा कार्यवाही झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेली कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पुर्ण,**

**फेरतपासणी काहीही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

दि.०६.०२.२०२६.

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.